एकतेच्या मार्गावर समाज व्याप्त आणि समृद्ध असतो

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार ७ जून २०२५ | अंक १७४ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु






# महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत फिक्सिंग? राहुल गांधींचा गंभीर आरोप

मुंबई : महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका म्हणजे लोकशाहीचे मॅच फिक्सिंग होतं असा आरोप लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला आहे. राज्यातील विधानसभा निवडणुकांवर आक्षेप घेत राहुल गांधींनी निवडणूक आयोगासह केंद्र सरकावर हल्लाबोल केला. महाराष्ट्रातील निवडक मतदान केंद्रावर बोगस मतदान झाल्याचा आरोपही राहुल गांधींनी केला. ही निवडणूक म्हणजे सत्ता मिळवण्यासाठी घडवलेला खेळ होता असा आरोपही राहुल गांधींनी केला. महाराष्ट्रात जी 'मॅच फिक्सिंग' झाली ती आता बिहार, इतर राज्यांमध्ये होणार अशी भीतीही राहुल गांधींनी या लेखातून व्यक्त केली. विधानसभा निवडणुकीतल्या महाराष्ट्राच्या निकालावर राहुल गांधींनी घेतलेली शंका कायम आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल म्हणजे मॅच फिक्सिंग असल्याचा आरोप राहुल गांधींनी केलाय. एका इंग्रजी वृत्तपत्रात लिहलेल्या लेखात त्यांनी महाराष्ट्रातल्या निवडणुकीत निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीबाबतही अनेक प्रश्न उपस्थित केले. निवडणूक आयुक्तांची निवड करणारी समितीच हेरफेर करून फिक्स केली. मतदार यादीत बनावट नावांची मोठ्या प्रमाणावर भर पडली, 5 महिन्यांत तब्बल 41 लाख नवीन मतदारांचा समावेश करण्यात आला. लोकसभा निवडणुकीत पिछाडीवर असलेल्या विधानसभा मतदारसंघात चमत्कारिक वाढ झाली. मतदानानंतर 76 लाख मतांची चमत्कारिक वाढ झाली. पुरावे लपवण्यासाठी नियमात बदल. CCTV फुटेज मागितल्यावर निवडणूक आयोगाकडून अडथळे निर्माण केल्याचा आरोप राहुल गांधींनी आपल्या लेखात केला. राहुल गांधींच्या आरोपांवर महायुती सरकार तुटून पडलंय. राहुल गांधींचं वक्तव्य हे नापास झालेल्या मुलासारखं असल्याचा टोला भाजपनं लगावलाय. राहुल गांधी आरोप करुन सामान्यांमध्ये संभ्रम निर्माण करत असल्याचं चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. राहुल गांधींच्या दाव्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी खरपूस भाषेत समाचार घेतलाय. राहुल गांधींचा दावा म्हणजे मतदारांचा अपमान असल्याचा आरोप फडणवीसांनी केला. राहुल गांधींनी निवडणूक प्रक्रियेवरच संशय व्यक्त केलाय. निवडणूक आयोगानं या विषयावर स्पष्टीकरण दिल्यानंतरही विरोधकांचं समाधान झालेलं नाही. पुढच्या काळात राहुल गांधी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत वाढलेल्या मतदानाचा मुद्दा उपस्थित करतील हे स्पष्ट झालं आहे.

## अंथरवन पिंपरी ग्रा.पं. व बीड शहर बचाव मंचाच्या वतीने पर्यावरण दिन व शिवराज्याभिषेक दिन वृक्षारोपण करून साजरा

दिनांक ६ जून रोजी शिवराज्याभिषेक दिन व काल झालेला जागतिक पर्यावरण दिन या दोन्हींचे औचित्य साधून अंथरवन पिंपरी येथे ठीक सकाळी नऊ वाजता शिवराज्याभिषेक ध्वजारोहण करून वंदन करण्यात आले. याच निमित्ताने ग्रामपंचायत व बीड शहर बचाव मंच यांच्या यांच्या संयुक्त सहयोगातून वृक्षावरोपणाचा कार्यक्रम राबविण्यात आला. बीड शहर बचाव मंचाच्या वतीने २०० झाडे देण्यात



आलेली आहेत व येत्या काळामध्ये ग्रामपंचायत १००० झाडे लावण्याचा उपक्रम लवकरच पूर्ण करील असा निर्धार व्यक्त करण्यात आला. नुकतेच लोकमत समूहाच्या वतीने अंथरवण पिंपरी ग्रामपंचायतीला सरपंच ऑफ इयर २०२५ हा पुरस्कार देण्यात आला आहे. गावच्या सरपंच सौ. शिवगंगा ताई भाऊराव प्रभाळे या दाम्पत्यांनी गावांमध्ये फार छान कौतुकास्पद विकास कामे राबवली आहेत व अक्षरशः गावाचा कायापालट केला आहे. गावामध्ये सगळीकडे गल्लोगल्ली सिमेंट रस्ते व पेवर ब्लॉक रस्ते केले आहेत. गावामध्ये अनेक विकासाच्या योजना राबविण्यात येत आहेत. ग्रामस्थांच्या सर्व अडीअडचणींना प्रभाळे दांपत्य अहोरात्र उभे असते. गावामध्ये वृक्षारोपण करून गावाला हिरवे नंदनवन करण्याचीअग्रणी भूमिका भाऊराव प्रभाळे यांनी घेतली आहे. आजच्या या वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाला वामा चित्रपटाचे प्रसिद्ध अभिनेते महेशकुमार वनवे यांची बीड शहर बचाव मंचाच्या वतीने प्रमुख उपस्थिती लाभली.

## आता तरी प्रकाश आंबेडकरांना समजून घ्या या परिसंवाद मेळाव्यास उपस्थित रहा

बीड । प्रतिनिधी महाराष्ट्राच्या राजकारणात २०१९ साली वंचित बहुजन आघाडी या पक्षाने उडी घेतली अन् प्रस्थापितांच्या उरात धडकी भरवत ४४ लाख मतदान लोकसभेला मिळविले विधानसभेला तो टक्का कमी कमी होत गेला याचे एकमेव मुख्य कारण म्हणजे काही स्वयंघोषित बुद्धिजीवी विचारवंत यांनी प्रस्थापितांच्या हाताला धरत त्यांच्याकडून गाड्या पैसे घेत वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अॅड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी घेतलेले निर्णय भूमिका प्रयोग हे चुकीचे आहेत याचा अपप्रचार सुरू केला आणि मतदार दुरावत गेला. वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांच्या संकल्पनेतून आता तरी प्रकाश आंबेडकरांना समजून घ्या या परिसंवाद मेळाव्याचे आयोजन केले असून फुले आंबेडकरी विद्वत सभेचे मा.भास्कर भोजने यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. या कार्यक्रमास वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय सदस्य महासचिव तथा जिल्हा प्रभारी प्रा. किसन चव्हाण, तक्रार निवारण समितीच प्रमुख प्रा. विष्णू जाधव यांच्यासह आजी-माजी जिल्हा, तालुका, शहर पदाधिकारी, कार्यकर्ते निवृत्त कर्मचारी अधिकारी हे उपस्थित विजयोत्सव साजरा करताना चाहत्यांनी संयम पाळणे अत्यंत गरजेचे आहे. तसे झाले तरच अशा अप्रिय घटनांना पायबंद बसू शकेल. अशा दुर्घटनेमुळे गर्दीचे व्यवस्थापन करणे ही काळाची गरज बनली आहे. अन्यथा ती आपत्ती ठरू शकते. धार्मिक, राजकीय, सामाजिक कारणांमुळे गर्दीची निर्मिती होते. सण उत्सव, जत्रा ही सुद्धा गर्दीची ठिकाणे आहेत. गर्दीला शिस्त नसते त्यामुळे गोंधळ होतो. लोकांच्या उत्साहाचा अतिरेक होतो तेव्हा परिस्थिती बिकट बनते. मुंबई शहराने विजयोत्सवाच्या अनेक घटना पाहिल्या आहेत, तुफान गर्दीचा अनुभव घेतला आहे. परंतु या गर्दीने कधीही अप्रिय घटनेचे गालबोट लागू दिले नाही. मुंबई पोलिसांनी आधीपासूनच केलेले नियोजन महत्त्वाचे ठरले. पोलिस, इतर अधिकारी, क्रिकेट बोर्ड आणि टीम मॅनेजमेंटच्या समन्वयाने सारे काही सुरळीत पार पडले.

## पावसाळ्या पूर्वी शहरातील नालेसफाई व स्वच्छतेचे कामे पूर्ण करा-सुहास पाटील

काही दिवसापूर्वी बीड मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे बीडकरांची तारांबळ उडाली अनेकदा शहरातील मुख्य व गल्लीतील रस्ते जलमय झालेले पाहवयास मिळाले होते. नगर पालिका प्रशासन नालेसफाई करत नसल्यानले पाण्याचा निचरा होत नाही. परिणामी बीड शहर सतत जलमय होत आहे. येणाऱ्या काळात मान्सूनचे पाऊस होणार आहेत अशा वेळी बीड शहर जलमय होणार नाही याची दक्षता घेण्यासाठी नगर परिषद प्रशासनाने तात्काळ बीड शहरात मान्सून पूर्व नालेसफाई आणि स्वच्छतेचे काम पूर्ण करावेत असे पत्रकात शिवसंग्राम शहराध्यक्ष सुहास पाटील यांनी म्हटले आहे. बीड नगरपालिकेने पावसाची चाहूल लागण्याआधीच संपूर्ण शहरातील नालेसफाईची कामे अत्यंत तातडीने पूर्ण करणे गरजेचे आहे . अवकाळी पावसाने नदी -नाले एक झाले



. महाराष्ट्रात सात जूनच्या नंतर मान्सूनचे आगमन होत असते. नगरपालिकेने जलदगतीने पावले उचलून नालीसफाईसाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांचा आढावा घेत संपूर्ण शहरातील नालीसफाई पूर्ण करणे गरजेचे आहे. थोड्या पावसानेच रस्त्यावर पाणी येते आणि गोरगरिबांच्या घरात शिरते . साचलेल्या पाण्यामुळे बीडचे चिखलबीड होऊन जाते . १५ जूनला शाळा सुरू होत आहेत . त्यामुळे पावसाळ्याआधीच शहर स्वच्छ झाले तरच पावसाच्या पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने होईल आणि शहराचे चिखलबीड होण्यापासून वाचवता येईल तसेच नगरपालिका प्रशासनाने नालीसफाईसाठी नियुक्त केलेल्या कामगाराचा आढावा घेतलेला आहे काय ? पावसाची चाहूल लागण्याआधीच ही कामे पूर्ण झाली पाहिजेत. तेव्हा लवकरात -लवकर नगरपालिका प्रशासनाने नालेसफाईची आणि स्वच्छतेचे कामे पूर्ण करावीत आणि नागरिकांच्या घरात पाणी गेल्यास नगर परिषद प्रशासनाने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शिवसंग्रामचे शहराध्यक्ष सुहास पाटील यांनी नगर पालिका प्रशासनाला केली आहे.

## अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांसाठी निवासी वसतिगृह

बीड । प्रतिनिधी निलज्योती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे अनुसूचित जातीतील इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी गिराम नगर , पांगरी रोड , बीड येथे निवासी वसतिगृह सुरू करण्यात आले आहे. या वसतिगृहात राहण्याची , जेवणाची व ट्युशनची व्यवस्था अतिशय माफक दरात करण्यात आली आहे. या विद्यार्थ्यांना बीड शहरातील नामवंत शाळेत प्रवेश दिला जाणार आहे. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासक्रमाबरोबरच इंग्रजी बोलणे ,नीट , जी , विविध स्पर्धा परीक्षा , शालेय स्पर्धा परीक्षा , स्कॉलरशिप , एन एम एम एस. इत्यादी परीक्षांचे तज्ज्ञ व अनुभवी प्राध्यापकांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. अनुसूचित जातीतील इयत्ता पाचवी ते दहावीतील विद्यार्थ्यांच्या पालकांनी आपल्या मुलांचे उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी आपल्या मुलाला निलज्योती निवासी वसतिगृहात प्रवेशित करावे. या वसतिगृहात फक्त ३० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे . त्यामुळे पालकांनी लवकरात लवकर संस्थेचे सचिव डॉ. नंदकुमार उघाडे यांच्याशी ( ८७६६८६९०८२ ) संपर्क साधून आपल्या मुलाची नाव नोंदणी करावी. असे आवाहन संस्थेचे सचिव डॉ. उघाडे यांनी केले आहे.

## युवा माहेश्वरी, परळी वैजनाथ आयोजित पार्थिव शिवलिंग पूजन

परळी वै । प्रतिनिधी युवा माहेश्वरी परळी वैजनाथ यांच्या वतीने आयोजित महेश नवमी सप्ताह २०२५ अंतर्गत ४ जून रोजी सायंकाळी ५:३१ वाजता पार्थिव शिवलिंग पूजनाचा पावन कार्यक्रम मोठ्या भक्तिभावात पार पडला. या कार्यक्रमात माहेश्वरी समाजाच्या ३१ जोडप्यांनी एकत्र येऊन पार्थिव शिवलिंगाचे पूजन केले. या पूजन विधीचे मार्गदर्शन आणि पूजन प. पू. पंडित श्री उत्तम महाराज शास्त्री यांच्या पवित्र हस्ते संपन्न झाले. या शुभ वेळी पार पडलेल्या या कार्यक्रमात मंत्रोच्चार, वेदघोष आणि भक्तिपूर्ण वातावरणाने संपूर्ण परिसर पावन झाला. अक्षता मंगल कार्यालय, परळी वैजनाथ येथे झालेल्या या धार्मिक सोहळ्यास समाजातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध आणि भाविक वातावरणात झाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी युवा माहेश्वरी परळी वैजनाथ संघटनेच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. समाज के लिए, समाज के साथ या ब्रीदवाक्याला अनुसरून समाज एकत्र आणण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.

## एमपीडी कायद्याअंतर्गत हातभट्टीचे दारुचा व्यापार करणाऱ्या इसमाची हर्सल कारागृहात रवानगी

बीड । प्रतिनिधी जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांनी जिल्हयाची धुरा सांभाळल्या पासुन शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत त्यांना बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मा. श्री. विवेक जॉन्सन यांची खंबीर साथ लाभली आहे. बीड जिल्ह्यातील गु ंडगिरीचे व गुन्हेगारीचे व वाळु माफीयांचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन एमपीडीए कायद्या अंतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गु ंडावर कार्यवाही करण्याचे योजिले आहे. त्या अनुषघांने पोनि पो. स्टे. संभाजीनगर परळी वै. यांनी दिनांक १२.०५.२०२५ रोजी इसम नामे रघुनाथ शिवाजी राठोड वय ६० वर्षे रा. धारावती तांडा ता. परळी जि.बीड याचे विरुद्ध एमपीडीए कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्फतीने मा. जिल्हादंडाधिकारी साहेब बीड यांना सादर केला होता. सदर स्थानबध्द इसमा विरुद्ध पोलीस ठाणे संभाजीनगर परळी येथे हातभट्टीची दारू जवळ बाळगणे, चोरटी विक्री करणे, अवैध दारुची वाहतुक करणे वगैरे स्वरुपाचे ०८ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. सर्व गुन्हे न्यायप्रविष्ट आहेत. सदरील इसम हा हातभट्टीच्या दारुचा चोरटा व्यापार करीत असल्याने पोलीसांची त्याचेवर बऱ्याच दिवसांपासून करडी नजर होती. सदर इसम हा पोलीसांची नजर चुकवुन हातभट्टीच्या दारुचा चोरटा व्यापार करीत होता. सदर इसमावर यापूर्वी महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ९३ प्रमाणे ०२ वेळा प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली होती.

## १६ वर्षाच्या मुलीला फुल लावून पळविले पोलीसांनी प्रकरण दाबून आरोपीला सोडून दिले

बीड । प्रतिनिधी आसरढव तालुका धारुर येथील एका १६ वर्षाच्या मुलीला आरोपीने फुस लावून पळवुन नेले. पुढे संभाजीनगर येथून बीड ग्रामीण पोलीसांनी आरोपी व पिडीतेस बीड येथे आणले तेथे आरोपीवर पोक्सो अंर्तत गुन्हा दाखल न करता अपहरणाचा गुन्हा नोंद केला तसेच पोलीसांनी पिडीतेच्या घरच्यांना दमदाटी करत प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला असल्याचा आरोप पिडीतेच्या पालकांनी जिल्हाधिकारी बीड यांना दिलेल्या निवेदनात केला आहे. जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पिडीता व आईसह आसरढव तालुका धारुर येथे राहते याच गावातील आरोपी नामे शुभम बाबुराव काचगुंडे हा सातत्याने पिडीतेला त्रास देत होता



म्हणून पिडीतेच्या घरच्यांनी तिला राजुरी ता.बीड येथे मावशीच्या घरी ठेवले होते परंतू आरोपीने तिला तेथून फुस लावून पळविले त्यानंतर १७ दिवसाचा कालावधी लोटल्यानंतर पुढे दि.२७ मे रोजी पिडीतेच्या घरी पोलीसांचा फोन आला की तुमची मुलगी व आरोपी शुभम काचगुंडे यास पकडू न आणलेले आहे. तुम्ही पोलीस स्टेशनला या असे सांगितले त्यावेळी आरोपीवर बीएनएस कलम १३७(२) अंतर्गतचा अपहरणाच्या गुन्ह्याचा कलम लावून पिडीतेच्या घरचे अशिक्षित आहेत याचा फायदा घेवून आरोपीच्या नातेवाईकांनी व पोलीसांनी कोर्या कागदावर सह्या घेवून प्रकरण जास्त वाढवू नका हे लोक तुम्हाला गावात राहू देणार नाहीत अशी धमकी दिली व प्रकरण जागेवरच दाबले त्यानंतर पोलीस अधिक्षक यांच्या समोर हा प्रकार गेल्यावर देखील कोणतीही कार्यवाही झालेली नाही त्यामुळे आरोपी व पोलीसांची मिलीभगत असून त्या दिवशी पोलीस स्टेशनमध्ये कायम झाले हे पाहण्यासाठी दि.२७ मे २०२५ रोजी सीसीटीव्ही फुट ेज तपासण्याची मागणी पिडीतेच्या घरच्यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे केली आहे. तसेच आरोपीविरुध्द मुलीला पळवून नेवून अत्याचार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करणे तसेच पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करणे आणि ग्रामीण पोलीसचे सदर प्रकरणातील तपासी अधिकारी यांच्या विरोधात अॅट्रॉसिटी कलम ४ प्रमाणे गुन्हा दाखल करावा अन्यथा मंगळवार दि.१०/०६/२०२५ पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसणार असल्याचे पिडीतेच्या घरच्यांनी जिल्हाधिकारी यांना कळविले आहे.

# संपादकीय

## इद उल अजहा : त्याग आणि समर्पणाचा पवित्र सण


इद उल अजहा, ज्याला बकरी ईद म्हणूनही ओळखले जाते, हा इस्लाम धर्मातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि पवित्र सण आहे. हा सण पैगंबर इब्राहिम (अलैहिस्सलाम) यांच्या अतुलनीय त्याग आणि समर्पणाच्या भावनेला स्मरण करतो. इस्लामिक इतिहासानुसार, अल्लाहने इब्राहिम अलैहिस्सलाम यांची परीक्षा घेण्यासाठी त्यांना त्यांच्या प्रिय पुत्र इस्माईल यांचा बळी देण्यास सांगितले. इब्राहिम अलैहिस्सलाम यांनी अल्लाहच्या आज्ञेचे पालन करण्यासाठी आपल्या हृदयातील प्रेम आणि ममत्वाला बाजूला ठेवत पूर्ण समर्पण दाखवले. जेव्हा त्यांनी आपल्या पुत्राला बळी देण्याचा संकल्प केला, तेव्हा अल्लाहने त्यांच्या विश्वासाला आणि निष्ठेला सलाम करत इस्माईलच्या जागी एक मेंढा पाठवला. हा ऐतिहासिक दाखला आजही प्रत्येक मुस्लिमाला त्याग, विश्वास आणि अल्लाहवरील श्रद्धेचा संदेश देतो.

इद उल अजहा केवळ बळी देण्याचा विधी नाही, तर तो आपल्या इच्छा, स्वार्थ आणि अहंकाराला त्यागण्याचा संदेश आहे. हा सण माणसाला आपल्या जीवनातील मूल्ये, कुटुंब आणि समाज यांच्याप्रती असलेल्या जबाबदाऱ्या समजावतो. बकरी ईदच्या निमित्ताने मुस्लिम बांधव आपल्या संपत्तीचा काही हिस्सा गरीब आणि गरजूंमध्ये वाटतात, ज्यामुळे सामाजिक समानता आणि बंधुभाव वाढतो. हा त्याग केवळ प्राण्याच्या बळीपुरता मर्यादित नसून, मनातील वाईट विचार, द्वेष आणि स्वार्थ यांचा त्याग करणेही यात समाविष्ट आहे.

हा सण भावनिक आणि वास्तववादी दृष्टिकोनातून माणसाला स्वतःच्या अंतर्मनाशी जोडतो. आपल्या प्रिय गोष्टींना अल्लाहच्या मार्गात समर्पित करण्याची तयारी ठेवणे, ही खरी श्रद्धा आहे. आजच्या काळात, जेव्हा भौतिकवाद आणि स्वार्थ माणसाच्या जीवनात वर्चस्व गाजवत आहे, इद उल अजहा आपल्याला साधेपणा, दया आणि परोपकाराची शिकवण देतो. हा सण कुटुंब, मित्र आणि समाजाला एकत्र आणतो, जिथे सर्वजण मिळून प्रार्थना करतात, अन्न वाटतात आणि आनंद साजरा करतात.

इद उल अजहाचा खरा संदेश आहे—जीवनात त्याग आणि समर्पणाशिवाय खरे यश आणि शांती मिळू शकत नाही. म्हणूनच, हा सण प्रत्येकाला प्रेरणा देतो की, आपण आपल्या जीवनात अल्लाहच्या इच्छेप्रमाणे चालावे, आपल्या कर्तव्याप्रती निष्ठा ठेवावी आणि समाजाच्या भल्यासाठी योगदान द्यावे. इद उल अजहाच्या या पवित्र प्रसंगी, चला आपण सर्वजण त्याग आणि समर्पणाची भावना अंगीकारूया आणि एकमेकांप्रती प्रेम, करुणा आणि बंधुभाव वाढवूया. इद मुबारक!

लेखक
जुनेद बागवान गेवराई
मो.9730075313




# चेंगराचेंगरीनंतरचे कवित्व


रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने १८ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आयपीएलचे जेतेपद संपादन केल्यावर बुधवारी बंगळुरूतील चिन्नास्वामी स्टेडियमवर आयोजित केलेल्या सत्कार समारंभादरम्यान चेंगराचेंगरी झाली अन् ११ जणांचा मृत्यू झाला. या चेंगराचेंगरी प्रकरणी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी), इव्हेंट मॅनेजमेंट कंपनी डीएनए आणि कर्नाटक क्रिकेट असोसिएशनविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चेंगराचेंगरी प्रकरणी कर्नाटक सरकारने गुरुवारी उच्च न्यायालयात स्थितीदर्शक अहवाल सादर केला. आता या प्रकरणाची चौकशी सीआयडीमार्फत केली जाणार आहे. तसेच विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना करण्यात येईल, असे कर्नाटक सरकारने उच्च न्यायालयात स्पष्ट केले. कार्यवाहक मुख्य न्यायाधीश व्ही. कामेश्वर राव आणि न्या. सी. एम. जोशी यांच्या खंडपीठाने राज्य सरकारला अपघाताचा स्थिती अहवाल सादर करण्यास सांगितले. पुढील सुनावणी १० जून रोजी होईल. आरसीबीच्या खेळाडूंना सन्मानित करण्याचा निर्णय कोणी घेतला, हे राज्य सरकारने स्पष्ट करावे. देशासाठी न खेळणा–या खेळाडूंचा सन्मान करण्याची काय गरज होती? असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांनी गुरुवारी उच्च न्यायालयात केला. तब्बल १८ वर्षांनंतर आयपीएलचे जेतेपद पटकावल्यानंतर विजयोत्सव करताना झालेल्या चेंगराचेंगरीत मृत झालेल्या ११ जणांच्या कुटुंबियांना प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत आरसीबीने जाहीर केली आहे. तसेच मृतांच्या कुटुंबियांना मदत करता यावी म्हणून ङ्गआरसीबी केअर्सफ नावाचा मदतनिधी देखील उभारला जात आहे. आरसीबीच्या विजयोत्सवात चेंगराचेंगरी प्रकरणी बीसीसीआय आणि आयपीएल प्रशासनाने हात झटकले आहेत. आयपीएलचे अध्यक्ष अरुण धुमल म्हणाले, चेंगराचेंगरीची घटना कळताच आम्ही ताबडतोब आयोजकांना कार्यक्रम लवकर संपवण्याची विनंती केली. या घटनेला बीसीसीआय जबाबदार नाही. ही खरोखरच अतिशय दु:खद घटना असून आम्ही मनापासून शोक व्यक्त करतो. बीसीसीआयसाठी आयपीएल अंतिम सामन्यानंतरच संपुष्टात आले. आम्हाला अशा कोणत्याही घटनेची कोणतीही माहिती नव्हती. मग त्यासाठी आम्हाला कसे जबाबदार धरता येईल? चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर घडलेली चेंगराचेंगरी हा केवळ एक अपघात नव्हे, तर संपूर्ण व्यवस्थेच्या अपयशाचे लक्षण आहे. मृत्युमुखी पडलेल्या परिवारामध्ये एका १३ वर्षांच्या चिमुरड्या मुलीचाही समावेश आहे. हे सारे पाहताना खूप वेदना होतात. या घटनेने आपल्याला एक मोठा धडा दिला आहे. कोणतीही भावना ही विवेकशून्य झाल्यास, ती विनाश घडवू शकते. उत्साह असावा पण त्याचबरोबर शहाणपणही असावे. कारण ज्या चिन्नास्वामी स्टेडियमची प्रेक्षक क्षमता ३५ हजार आहे तिथे जर दीड–दोन लाख लोक जमा होत असतील तर प्रशासन व सुरक्षा यंत्रणा काही करू शकत नाही. आपणही निरपराध नाही. ङ्गसंधी चुकवायची नाहीफ या मानसिकतेमुळे शिस्त मोडली जाते. अफवा, गोंधळ, ढकलाढकली हे सगळं चक्र आपणच सुरू करत असतो. सामान्य माणूसही संयम बाळगू शकत नाही ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. मुळात, अशा गर्दीत जायची काय गरज होती? चेंगराचेंगरी होऊ शकते हे माहीत असताना लोक गर्दीत घुसतात ही आश्चर्याची गोष्ट म्हणावी लागेल. आपला जीव ही आपलीच जबाबदारी असते. गेलेले प्राण परत मिळत नाहीत. त्यामुळे अशा दुर्दैवी घटनेनंतर आगामी काळात तरी सर्वसामान्य लोक त्यापासून काही बोध घेतील ही अपेक्षा. व्याधी, दु:ख, मरण या घटना मानवाधीन नसल्या तरी विवेकबुद्धीचा वापर करणे नक्कीच मानवाधीन आहे. विजयी संघाचे स्वागत झाले पाहिजे यात वाद नाही पण आनंद साजरा करण्यासाठी आपले ङ्गअसणेफ महत्त्वाचे आहे. आनंदाचा उत्सव साजरा करताना समोर दिसणारे संकट ओळखू विजयोत्सव साजरा करताना चाहत्यांनी संयम पाळणे अत्यंत गरजेचे आहे. तसे झाले तरच अशा अप्रिय घटनांना पायबंद बसू शकेल. अशा दुर्घटनेमुळे गर्दीचे व्यवस्थापन करणे ही काळाची गरज बनली आहे. अन्यथा ती आपत्ती ठरू शकते. धार्मिक, राजकीय, सामाजिक कारणांमुळे गर्दीची निर्मिती होते. सण उत्सव, जत्रा ही सुद्धा गर्दीची ठिकाणे आहेत. गर्दीला शिस्त नसते त्यामुळे गोंधळ होतो. लोकांच्या उत्साहाचा अतिरेक होतो तेव्हा परिस्थिती बिकट बनते. मुंबई शहराने विजयोत्सवाच्या अनेक घटना पाहिल्या आहेत, तुफान गर्दीचा अनुभव घेतला आहे. परंतु या गर्दीने कधीही अप्रिय घटनेचे गालबोट लागू दिले नाही. मुंबई पोलिसांनी आधीपासूनच केलेले नियोजन महत्त्वाचे ठरले. पोलिस, इतर अधिकारी, क्रिकेट बोर्ड आणि टीम मॅनेजमेंटच्या समन्वयाने सारे काही सुरळीत पार पडले. मुंबई पोलिसांनी बंगळुरूपेक्षा दहापट जास्त गर्दी हाताळली परंतु एकही दुर्घटना घडू दिली नाही. २०२४ मध्ये टी–२० विश्वकप विजेत्या भारतीय संघाचा विजयोत्सव साजरा झाला तेव्हा मुंबई पोलिसांचा चोख बंदोबस्त कौतुकास्पद होता. भारतीय संघानेसुद्धा पोलिसांचे आभार मानले होते. भारतीय संघाची विजयी यात्रा यशस्वी करण्यासाठी ८०० हून अधिक पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. संघाच्या बसभोवती १०० पोलिसांचे कडे होते आणि प्रत्येक चौकात १०० हून अधिक पोलिस तैनात करण्यात आले होते. राज्य राखीव पोलिस दल, केंद्रीय सुरक्षा दलाचे जवानही बंदोबस्तासाठी होते. वानखेडे स्टेडियममध्येही बंदोबस्त होता. देशातील राज्यांनी मु ंबई पोलिसांच्या व्यवस्थापनाचे अनुकरण करायला हवे. न उत्साहाला काबूत ठेवले तर आपल्या मौल्यवान जीवाचे रक्षण होईल. विजयोत्सव साजरा करताना चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू होणे ही घटना अत्यंत क्लेशदायक आहे. मुळात आयपीएलमध्ये खेळणारे संघ त्या–त्या राज्याचे प्रतिनिधित्व करतात का? कारण आयपीएलमध्ये संघमालक आपली आर्थिक गुंतवणूक करतात, विविध देशांचे खेळाडू लिलावात विकत घेतात. त्यांचा आयपीएलच्या माध्यमातून नफा कमावणे हा उद्देश असतो. खेळाडूंना जरी आर्थिक लाभ होत असला तरी अंतिमत: मालामाल हा संघमालकच होत असतो. क्रिकेट कसोटी मालिका, विश्वकप, टी–२० चषक स्पर्धेत खेळताना खेळाडू आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करतात. त्यामध्ये मिळालेल्या विजयाचा आनंद क्रिकेटप्रेमींसाठी नव्हे तर देशासाठीही अभिमानाचा क्षण असतो. या उलट आयपीएलकडे फक्त मनोरंजन म्हणून चाहते पाहतात. म्हणून आयपीएलमध्ये होणा–या आर्थिक उलाढालीकडे चाहत्यांनी डोळसपणे पाहण्याची गरज आहे. तसेच

# पालकमंत्री अजित पवार असूनही बीडमध्ये फरक नाही – नागरिकांमध्ये तीव्र संताप, नगरपरिषद चे भूमिकेवर प्रश्नचिन्ह!

बीड प्रतिनिधी | लोक इच्छा बीड शहरातील रस्त्यांची खड्डेमय अवस्था, सर्वदूर पसरणारा कचरा, दुर्गंधी, वाहतुकीचा अडथळा आणि स्वच्छतेचा अभाव यामुळे शहरवासीय त्रस्त झाले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार हे बीडचे पालकमंत्री असूनही पडलेले दिसतात. नियमित स्वच्छता होत नसल्यामुळे नागरिक आजारी पडण्याच्या संकटात आहेत. मोकाट कुत्रे, डास, आणि दुर्गंधीमुळे अनेक भागांतील नागरिकांना घराबाहेर पडणेही अवघड झाले आहे.

रस्ते म्हणजे खड्ड्यांचा खजिना!





शहराच्या समस्या जशाच्या तशाच राहिल्या आहेत, आणि त्यामुळे आता जनतेतून असंतोष उफाळून आला आहे.

“शहरात सर्वत्र कचरा – कोण जबाबदार?”


शहरातील मुख्य बाजारपेठ, बस स्थानक परिसर, रुग्णालयाजवळ, झमझम कॉलनी या भागांमध्ये कचऱ्याचे ढीग

“शहरातील काही रस्ते म्हणजे रस्ते नसून खड्ड्यांची मालिका वाटते,” असा संतप्त प्रतिक्रिया एका नागरिकाने दिली. अतिवृष्टी नसतानाही पावसाळ्यासारखी अवस्था आहे. ठिकठिकाणी रस्ते खोदून पडलेले असून, त्यांची दुरुस्ती होत नाही.

“नेते केव्हा जागे होणार?”

## “जनतेचा इशारा – काम करा, नाहीतर...!” शहरात एक नवा सूर ऐकू येतोय –

“काम कराल, तरच मतदान मिळेल. नाहीतर जनता आता मूग गिळून बसणार नाही. बीड शहरातील स्वच्छता आणि रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. पालकमंत्री असतानाही अजित पवार यांच्याकडून ठोस बदल दिसलेले नाहीत. नगरपरिषद निष्क्रियतेमुळे जनता अस्वस्थ झाली असून, आगामी निवडणुकीत नागरिक याच मुद्द्यावर मतदारसंघात निर्णय घेतील, असे स्पष्ट संकेत मिळत आहेत.



नागरिकांचा सवाल स्पष्ट आहे – “आजी, माजी आणि भावी नगरसेवक यावर लक्ष घालणार का?” निवडणुकीच्या वेळी घरोघरी जाऊन मत मागणारे हेच लोकप्रतिनिधी आज या गंभीर समस्यांवर मौन का बाळगत आहेत? शहराची अवस्था पाहता कुणाच्याही मनात लाज निर्माण होईल, पण यावर ठोस कृती दिसत नाही. केवळ फोटो काढणे, फेसबुकवर पोस्ट टाकणे आणि भाषणं देणे हेच त्यांचे काम उरले आहे का?

“पालकमंत्री असूनही फरक शून्य!”

बीडचे पालकमंत्री असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शहर विकासासाठी बैठका घेतल्या, योजनांची घोषणाही केली, पण प्रत्यक्षात नागरिकांना त्याचा काहीही फायदा झालेला नाही. नगरपरिषद प्रशासन, स्थानिक स्वच्छता यंत्रणा, आणि लोकप्रतिनिधींमध्ये समन्वयाचा अभाव स्पष्टपणे जाणवतो.

“मतदानाच्या वेळी मात्र दरवाज्यावर हजर!”

जनता आता विचारू लागली आहे – “जर सध्याच्या समस्यांकडे लक्ष दिलं जात नसेल, तर येणाऱ्या निवडणुकीत तुम्ही मत मागायला येणार तरी कशाच्या आधारावर?” प्रश्न केवळ स्वच्छतेचा नाही, तर लोकप्रतिनिधींच्या संवेदनशीलतेचा आणि त्यांच्या कार्यक्षमतेचा आहे.

# खरीप-पूर्व विकसित कृषी संकल्प अभियानांतर्गत शेतकरी शास्त्रज्ञ संवाद

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : कृषी विज्ञान केंद्र पोखर्णी तर्फे विकसित कृषी संकल्प अभियानाची दिनांक 29 मे पासून उत्साहात सुरुवात झाली. या अभियानाचा उद्देश शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक संशोधन यांची माहिती देणे आहे.

अभियानाचा व्यापक विस्तार:- या अभियानाद्वारे शेतीतील सुधारित तंत्रज्ञान, उत्पादन खर्च कमी करण्याचे उपाय, सेंद्रिय शेती आणि पिकांची विविधता वाढवणे यावर भर दिला जात आहे. भारतीय कृषी संशोधन परिषद (ICAR) च्या मार्गदर्शनाखाली हे अभियान ७२३ जिल्ह्यांमध्ये राबवले जात असून ७३१ कृषी विज्ञान केंद्रे आणि ११३ संशोधन संस्थांचे शास्त्रज्ञ यात सक्रिय सहभाग घेत आहेत.

विशेष कार्यक्रम :- कृषी विज्ञान केंद्र पोखर्णी तर्फे आयोजित अर्धापूर तालुक्यातील शहापूर, अमरापूर, बारसगाव, मालेगाव, खैरगाव, कामठा, लोणी, पांगरी आणि कोंढा या गावांतील कार्यक्रमात शेतकऱ्यांना थेट मार्गदर्शन करण्यात आले. प्रगत तंत्रज्ञान, मृदा आरोग्य व्यवस्थापन, केळी लागवड व व्यवस्थापन, शेतीविषयक आणि अन्न प्रक्रिया विषयक विविध राज्य व केंद्र शासकीय योजना, पशुसंवर्धन, अन्न प्रक्रिया उद्योग, सेंद्रिय परसबाग आणि बियाण्यांची उगवणक्षमता चाचणी, बियाणांच्या वाणाची निवड यासंदर्भात तज्ज्ञांनी माहिती दिली.

तज्ज्ञांचे मार्गदर्शन :- या कार्यक्रमात राष्ट्रीय मृदा संशोधन केंद्र नागपूर चे वैज्ञानिक डॉ. हुकुमराज खरबीकर, पशुवैद्यकीय महाविद्यालय उदगीर चे प्रा. डॉ. संजीव पिटलावाड, केळी संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. शिवाजीराव शिंदे, कृषी विज्ञान केंद्राचे कृषिविद्या तज्ञ प्रा. एस.एच. जायभाये, गृह विज्ञान तज्ञ सौ. ए.एस.पवळे, तसेच अर्धापूर तालुक्याचे मंडळ कृषी अधिकारी श्री. सुनील देवकांबळे, तालुका कृषी अधिकारी श्री. विशाल बिऱ्हाडे, उप कृषी अधिकारी श्री. गणेश वाघोळे तसेच प्रगतिशील शेतकरी श्री. भगवान भाईजी इंगोले यांनी मार्गदर्शन केले.

उद्घाटन सोहळा आणि पुढील दिशा शेतकऱ्यांसाठी सुवर्णसंधी या अभियानाद्वारे शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळणार असून, उत्पादन खर्च कमी करण्याच्या उपाययोजना, सेंद्रिय शेतीचे फायदे आणि विविध सरकारी योजनांचा लाभ घेता येईल.



पुढील कार्यक्रमाची रूपरेषा

पुढील कार्यक्रमासाठी मुदखेड तालुक्यातील ईजळी, चिकाळा, आमदुरा, राजवाडी डोंगरगाव, बारड, रोही पिंपळगाव, डोणगाव वसंतवाडी, पाथरड (हिस्सा), पाथर्डी (रेल्वे)आणि खंबाळा या गावांमध्ये करण्याचे योजिले आहे. तरीही जास्तीत जास्त शेतकरी बांधव महिला भगिनींनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन कृषी विज्ञान केंद्र पोखर्णी नांदेड -१ च्या वतीने करण्यात येत आहे.

# सोयाबीन बियाणे वाटपात शेतकऱ्यांची फसवणूक; जिल्हाधिकारी साहेबांनी लक्ष घालावे - संचालक धनंजय गुंदेकर



बीड (प्रतिनिधी) राज्य शासनामार्फत वीस गुंठे ते एक हेक्टर शेती असलेल्या शेतकऱ्यांसाठी महा डीबीटी द्वारे अनुदान तत्त्वावर बियाणे वाटप करण्याची योजना मंजूर करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना सोयाबीनचे बियाणे शंभर टक्के अनुदानावर प्राप्त होते. बीड तालुक्यातील हजारो शेतकरी या योजनेत पात्र ठरलेले आहेत. या योजनेचे उद्दिष्ट शेतकऱ्यांना सुधारित व दर्जेदार बियाणे मिळणे शेतकऱ्याचे उत्पन्नामध्ये वाढ होणे व शाश्वत शेतीला चालना मिळणे होय सदर बियाणे शेतकऱ्यांना पुरवण्याची जबाबदारी ही महाबीजची आहे. मात्र महाबीज कडूनच शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याचे संचालक धनंजय गुंदेकर यांनी म्हटले आहे.

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार सोयाबीनच्या बॅगेला 25 किलो 22 किलो व 30 किलो पॅकिंगची मान्यता मिळालेली आहे. परंतु बीड जिल्ह्यामध्ये महाबीज द्वारा द्वारा फक्त 22 किलो ची बॅग शेतकऱ्यांना देण्यात येत आहे. त्यामुळे शासनामार्फत 75 किलो अनुदानास प्राप्त असल्यास शेतकऱ्यांना 66 किलो बियाणे मिळत आहे. शेतकऱ्यांना नऊ किलो बियाणे व त्या बियाण्यावरील अनुदान कमी मिळत आहे. शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी राज्य शासनाने मंजूर केलेला या योजनेला महाबीज च्या चुकीमुळे व्यत्यय येत आहे व शेकडो शेतकऱ्यांना ०९ किलो बियाणे हे कमी मिळत आहे तरी शेतकऱ्यांची होत असलेले नुकसान पाहता महाबीजवर त्वरित कारवाई करावी अशी मागणी जिह्लाधिकाऱ्यांकडे कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक धनंजय गुंदेकर यांनी निवेदनाद्वारे केली आहे..

# प्रदीप मिश्रा महाराज यांच्या शिवपुराण कथेसाठी 60 जादा बसेस उपलब्ध
# भाविकांनी एसटी बस सेवेचा लाभ घ्यावा - नितेश उपाध्ये



### जिल्ह्यातील ज्यादा बसेस ची माहिती

बीड 10, धारूर 10, माजलगाव 5, परळी 5, गेवराई 5, पाटोदा 10, आष्टी 5, अंबाजोगाई 10 अशा एकूण 60 जादा बसेसची व्यवस्था एसटी महामंडळाकडून करण्यात आली आहे.

### यात्रा शेड ची व्यवस्था

जिल्हाभरातून येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी राज्य परिवहन महामंडळाकडून यात्रा शेडची व्यवस्था चाकरवाडी फाटा ते नेकनूर दरम्यान मुख्य रस्त्याच्या बाजूला एचपी पेट्रोल पंप जवळ करण्यात आली आहे


### भाविकांनी एसटी बससेवेचा लाभ घ्यावा - नितेश उपाध्ये

बीड जिल्ह्यातील सर्व बस स्थानकातून चाकरवाडी येथे आयोजित पंडित प्रदीपजी मिश्रा महाराज यांच्या शिवपुराण कथेसाठी लाखो भाविक येण्याच्या दृष्टीने राज्य परिवहन महामंडळ बीड यांनी मागणीप्रमाणे ६० जादा बसेसची सुविधा उपलब्ध करून दिली आहे याचा लाभ भाविकांनी घ्यावा असे आव्हान नितेश उपाध्ये यांनी केले आहे.

बीड (प्रतिनिधी) जिल्ह्यातील श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महान संत माऊली महाराज (चाकरवाडीकर) यांच्या पंचविसाव्या पुण्यतिथी निमित्त रोप्य महोत्सवाचे आयोजित करण्यात आला असून परमपूज्य पंडित श्री प्रदीप मिश्रा महाराज यांच्या शिवपुराण कथेसाठी मोठ्या प्रमाणावर भक्तगण दाखल होत आहेत. भक्तांच्या गर्दीचा आणि सोयी-सुविधांचा विचार करून बीड जिल्हा परिवहन विभागाने ज्यादा बसेस सोडण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या कथेसाठी जिल्ह्यातील सर्व आगारामार्फत अतिरिक्त 60 बसेस उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. बीड विभाग नियंत्रकांच्या आदेशानुसार, भक्तांना त्यांच्या गावी सहजपणे पोहोचता यावे आणि परतीचा प्रवासही आरामदायक व्हावा, यासाठी जादा बसेस विविध मार्गांवर चालवल्या जाणार आहेत. कथेमध्ये येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये, गर्दी नियंत्रणात राहावी आणि वाहतूक सुरळीत पार पडावी, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. शिवपुराण कथा 8 जून ते 14 जून आठवडाभर चालणार असून दररोज लाखो भक्त सहभागी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे स्थानिक प्रशासन, वाहतूक विभाग आणि स्वयंसेवक मंडळ यांच्यामार्फत नियोजनबद्ध वाहतूक व सुविधा दिल्या जाणार आहेत. भक्तांनी सार्वजनिक वाहतुकीचा म्हणजेच रा.प. बस सेवेद्वारे प्रवास करण्याचे आवाहन विभाग नियंत्रक

# कोणत्याही आपत्तीसाठी तयार रहा : निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी
# आपदा मित्र प्रशिक्षणाला उत्स्फूर्त प्रतिसाद ; सुमारे १५० उमेदवाराचा सहभाग

. जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे सहा जूनपासून सुरु झालेल्या १२ दिवसीय ङ्गआपदा मित्र प्रशिक्षणङ्ग कार्यक्रमास उमेदवारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे . पहिल्याच दिवशी सुमारे १५० प्रशिक्षणार्थींनी यात सहभाग नोंदवला . बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या प्रशिक्षणात बीड मधील नागरिक , महाविद्यालयीन विद्यार्थी , एनसीसी उमेदवार , सामाजिक संस्था , शासकीय / निमशासकिय कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन केले आहे . सात जून शनिवार रोजी बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी या प्रशिक्षण ठिकाणी भेट दिली . यावेळी त्यांनी प्रशिक्षणार्थी यांच्याशी संवाद साधला . यावेळी बोलताना निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी म्हटले की नैसर्गिक आपत्ती येऊच नये अशी आपली इच्छा असते . तथापि आपत्ती ही अचानक येत असते . यावेळी आपण सर्वांनी तयार असले पाहिजे . तहसीलदार शेळके यांनी आपल्या भाषणात म्हटले की नैसर्गिक आपत्ती बाबतचे प्रशिक्षण सर्वांनी गांभीर्याने घ्यावे . २००४ सालची हिंदी महासागरातील त्सुनामी सर्वांच्या स्मरणात असेलच . दक्षिण भारत , अंदमान निकोबार बेटे , लक्षद्वीप बेटे , इंडोनेशिया इत्यादी भागात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते . २००१ सालचा गुजरात मधील भूकंप ज्यात जवळपास चार लाख लोक बेघर झाले होते , १९९९ सालचा ओडिशा मधील सुपर सायक्लोन , मुंबईतील अतिवृष्टी या प्रमुख आपत्ती आपण अनुभवल्या आहेत , त्यामुळे संभाव्य आपत्तींचा साम ना करण्यासाठी आपण सज्ज राहायला हवे , असेही आवाहन त्यांनी केले . विशेष म्हणजे, प्रशिक्षणामध्ये महिलांचाही लक्षणीय सहभाग दिसून येत असून आपत्ती व्यवस्थापनासारख्या क्षेत्रात महिला देखील सक्रियपणे पुढे येत आहेत , ही बाब विशेष उल्लेखनीय आहे .



हा प्रशिक्षण उपक्रम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण ( एस डी एम ए ) यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला असून जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण व जिल्हा क्रिडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने याचे आयोजन करण्यात आले आहे . प्रशिक्षणात उमेदवारांना आपत्तीच्या वेळी तात्काळ मदत , बचाव कार्य , प्राथमिक उपचार , स्ट्रेचर वापर , दोरखंडाची मदत , तसेच पूर , भूकंप , वीज पडणे यासारख्या नैसर्गिक आपत्तींम धून नागरिकांचे प्राण वाचविण्यासाठीचे प्रशिक्षण दिले जात आहे . व्यावसायिक प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण दिले जात आहे . महिला प्रशिक्षणार्थींनी यामध्ये विशेष आवडीने सहभाग घेतल्याने मआपदा मित्रफ ही मोहीम सर्वसमावेशक आणि समतोल दिशेने वाटचाल करत असल्याचे चित्र दिसून आले आहे . महिलांचे सहभागाचे प्रमाण वाढल्याने आपत्ती काळात स्थानिक स्तरावर महिलांच्या माध्यमातूनही प्रभावी मदत मिळू शकणार आहे . प्रशिक्षणाच्या प्रारंभी प्रशिक्षकांनी प्रशिक्षणाच्या गरजेवर भर देत उपस्थितांम ध्ये आपत्ती काळात स्वयंसेवेच्या माध्यम ातून समाजाची सेवा करण्याचा संदेश दिला . हा उपक्रम पुढील १२ दिवस सुरू राहणार असून दररोज विविध प्रात्यक्षिके व सैद्धांतिक सत्राद्वारे प्रशिक्षण दिले जाणार आहे . प्रशिक्षणानंतर पात्र उमेदवारांना आपत्ती व्यवस्थापन किट व प्रशस्तीपत्रक देण्यात येणार असून त्यांची नोंद ङ्गआपदा मित्रफम्हणून जिल्हास्तरावर करण्यात येणार आहे . या प्रशिक्षणामध्ये बीड मधील नागरिक , महाविद्यालयीन विद्यार्थी , एनसीसी उमेदवार , सामाजिक संस्था , आशा / अंगणवाडी सेविका , होमगार्ड , पोलिस , खाजगी सुरक्षा रक्षक , शासकीय / निमशासकिय कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन करण्यात येत आहे .

# गडचिरोलीत गोदावरी नदीपात्रात 8 तरुण बुडाले, शोध मोहिम सुरु



गडचिरोली जिल्ह्याला लागून असलेल्या तेलंगणा राज्यातील सीमावर्ती भागात एक हृदयद्रावक घटना घडली आहे. गोदावरी नदीच्या पात्रात अंघोळीसाठी गेलेले 8 जण बेपत्ता झाले आहे. या 8 युवकांपैकी 2 जणांना वाचवण्यात स्थानिकांना यश आले आहे. मात्र 6 जण पाण्यात बेपत्ता झाले आहेत. यामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तेलंगणातील अंबडपल्ली भागात संध्याकाळी 6.30 च्या सुमारास ही घटना घडली. अंबडपल्ली येथील गोदावरी नदीच्या पात्रात हे आठ युवक अंघोळीसाठी गेले होते. मात्र, गोदावरी नदीत पाण्याचा प्रवाह जास्त होतो. या तरुणांना प्रवाहाचा अंदाज आला नाही. त्यामुळे वाहत्या पाण्यात ते वाहून गेले. हे सर्व बेपत्ता युवक २० वर्षांखाली आहेत. सहा युवकांचा अजूनही बेपत्ता या घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तात्काळ धाव घेतली. स्थानिकांच्या प्रयत्नांमुळे दोन युवकांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले आहे. मात्र, उर्वरित सहा युवकांचा अजूनही पत्ता लागलेला नाही. बेपत्ता झालेल्या युवकांचा शोध घेण्यासाठी गोदावरी नदीच्या काठावर शोध मोहीम सुरू करण्यात आली आहे. मात्र या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. बेपत्ता झालेल्या युवकांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. बेपत्ता झालेल्यांची नावे पत्ती मधुसूदन (१५) पत्ती मनोज (१३) कर्नाळा सागर (१४) तोगरी रक्षित (११) पांडू (१८) राहुल (१९) नातेवाईकांचा आक्रोश या घटनेनंतर मुलांचे नातेवाईक आणि त्यांच्या कुटुंबियांनी गोदावरी नदीकाठी गर्दी केली. बुडालेली ही मुले सुखरुप परत यावीत, अनेकजण प्रार्थना करत होता. यावेळी काळीज पिळवटणाऱ्या आक्रोशामुळे परिसर सुन्न झाला होता

# महाराष्ट्रात गोरक्षकाच्या नावाने मुस्लिम समाजावर अत्याचार होत असेल तर मुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावा :- शेख युनुस



बीड प्रतिनिधी
महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, अण्णाभाऊ साठे ,मौलाना आझाद या म हापुरुषांचा आहे. आणि जर इथे जाणून बुजून गोरक्षकाच्या नावाने मुसलमानांना टार्गेट करून त्यांच्यावर कोयत्याने तलवारीने अत्याचार होत असेल तर सर्वात प्रथम नितेश राणे हे सरकारमधील मंत्री असून भडकाऊ भाषण करीत आहे. स्वतः ची राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी दोन समाजात तेढ निर्माण होईल अशी विधाने करत असतात त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. जर हे होत नसेल तर मा. मुख्यमंत्री साहेब यांचा त्यांना अप्रत्यक्षपणे पाठिंबा आहे का असे दिसून येते असे असेल तर त्यांनी राजीनामा द्यावा. आपला भारत देश हा संविधानावर चालणारा आहे.या देशासाठी हजारो मुसलमानाने आपली जीवाचे प्राण दिलेले आहे. काही जातीवादी संघटना जाणून बुजून केवळ जातीय व्देषातून मस्तावाल गोरक्षक मुसलमाच्या जीवावर उठल्याचे चित्र दिसून येत आहे. कसलीही खात्री न करता गोरक्षकाकडून मुसलमानावर प्राणघातक हल्ले वाढले आहे.या गोरक्षकांना सरकारी बळ असून एक प्रकारे सरकारी गुंड असल्याचेही दिसून येत आहे.अनेक ठिकाणी जनावराच्या वाहतूक करणारी वाहने अडवून मारहाण केल्याच्या घटना वाढत आहे.कोणत्याही अधिकार नसताना कायदा हातात घेतला जात आहे. व त्याच्यावर कसलीही कारवाई होत नसल्याचे दिसून येत आहे. पोलिसाकडे तक्रार केली तर गोरक्षकाच्या बाजूने सरळ सरळ पक्षपाती भूमिका घेत असल्याचे दिसून येत आहे. परंतु पोलिसांनी जात धर्म न पाहता दोषीवर कारवाई करायला हवी महाराष्ट्रात कधी दलित, कधी मुस्लिम ,कधी महिला , यांच्यावर अत्याचार होण्याचे प्रमाण वाढले आहे याला जबाबदार हे सरकार आणि गृहमंत्री हे जबाबदार आहेत महाराष्ट्राची प्रतिमा म लिन करण्याचं कारस्थान काही जातिवादी मंत्र्यांकडून होत आहे . समता,न्याय, बंधुता, यासंविधानाचच्या तत्त्वाप्रमाणे कायद्याचे राज्य चालावे अशी अपेक्षा जनतेची आहे.

# ना जातीचा ना धर्माचा एक हात मदतीचा महाराष्ट्र आधार सेनेची जनसेवेसाठी स्थापना.
## दीपक थोरात यांच्या कार्याचे बीड जिल्ह्याबाहेरही कौतुक - राष्ट्रवादीचे युवा नेते रणवीर काका पंडित.
### गेल्या पंधरा वर्षापासून दीपक जनसेवेमध्ये काम करत आहे अँड शफीक भाऊ. रणवीर राजे पंडित शैक्षणिक भाऊ गणेश बापू थोरात यांची विशेष उपस्थिती.

बीड प्रतिनिधी - महाराष्ट्र राज्याच्या कानाकोपऱ्यात सध्या ती परिस्थिती पाहता जातीचा विस्तारला जात आहे या जातीच्या विषयाच्या प्रभावाने बीड जिल्ह्याची मोठी बातमी होत आहे यातच आता महाराष्ट्र आधार सेनेची स्थापना करण्यात आलेली आहे महाराष्ट्र आधार सेनेच्या ब्रीद वाक्याने बीड जिल्ह्यातील जनतेकडून व महाराष्ट्रातील जनते कडून थाप मिळत आहे ना जातीचा ना धर्माचा एक हात मदतीचा या ब्रीदवाकयामुले जाती भेदाच्या विषामुळे बीड जिल्हा बदनाम झालेला आहे त्यामुळे महाराष्ट्र आधार सेनेने कुठल्याही महापुरुषांच्या नावावर किंवा रंग बघून सामाजिक संघटना काढली नाही तर ही सामाजिक संघटना महाराष्ट्र सह बीड जिल्ह्यातच नव्हे तर अखंड महाराष्ट्रातील युवकाना सोबत घेऊन काम करणार आहे यामध्ये प्रामुख्याने पाहिले तर बीड जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागातून येणाऱ्या प्रत्येक माणसाच्या मदतीला जाऊन जाणारा दीपक थोरात सर्व समाजाच्या लोकांना सोबत घेऊन संघटना स्थापन करत आहे नक्कीच या संगटनेला चांगले दिवस येतील दीपक थोरात हे जनसेवेसाठी आम्ही जाती बाजूला ठेवून काम करणारे आहोत असे प्रतिपादन यावेळी युवा नेते रणवीर पंडित यांनी म्हटले आहे तर आम्ही सोबत राजकीय जीवनामध्ये राजकीय पदावरती काम केलेले आहे दीपक थोरात कडे आज संघटनेच्या माध्यमातून एक रुपया न देता हजारो लोक जमा होतात त्यामुळे दीपक ची संघटना ही




महाराष्ट्रामध्ये व बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये उभारणी नक्कीच घेईल असे प्रतिपादन शफिक भाऊ यांनी केले आहे आहे तर गणेश बापू थोरात यांनी दीपक आमच्या परिवारातील सर्वसामान्यांच्या मदतीला जाऊन जाणारा एकमेव माणूस आहे तर गोपाल धांडे यांनी शुभेच्छा दिल्या यावेळी महाराष्ट्र आधार सेनेला शुभेच्छा दिल्या व्यासपीठावरती राष्ट्रवादीची युवा नेते रणवीर पंडित एमआयएमचे जिल्हाप्रमुख राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष धांडे महाराष्ट्र आधार सेनेचे कार्याध्यक्ष उद्धव आरे अमोल मुजमुले

महाराष्ट्र आधार सेनेची स्थापना जातीयवादाच्या विरोधामध्ये काम करणार आहे बीड जिल्ह्यामध्ये नात जातीचाना धर्माचा एक हात मदतीचा म्हणून या संघटनेचे ब्रीद वाक्य आहे आणि ही संघटना ही सर्वसामान्यांच्या अडीअडचणीसाठी सदैव कटिबद्ध राहील. ला जातीचा धर्माचा ही विरोधात घेऊन आणि आज महाराष्ट्रभर फिरणार आहोत तर यावेळी मात्र कुठलाही रंग किंवा कुठले महापुरुषाचे विचारावरती कुणाचेही मनामध्ये द्वेष किंवा कोणावरती टीका करणार नाहीत आम्ही आमच्या कामातून संबंधित जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी लढा उभारणार आहोत येणाऱ्या काळामध्ये बीड जिल्ह्यातील 18 जिल्हाप्रमुख यांची निवड करण्यात येणार आहे.

बाबू हातागळे लहुजी साळवे चे लाला दुनघव विजय चांदणे आमदार संदीप क्षीरसागर यांचे समर्थक करने भैया लोंढे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे माजलगाव तालुक्यातील ब्रह्म गावचे उपसरपंच राधे कांबळे युवा नेते शाहीर युवराज ढगे बाप्पा कसबे लोकशाही पत्रकार संघाचे अध्यक्ष भागवत वैद्य आझाद समाज पार्टीचे आशिष कुमार चव्हाण पंडित मित्र मंडळाचे काशिनाथ आढागळे अभिजीत देडे बापू किरवले भाऊसाहेब मोमीन अशोक आबा वाघमारे जावेद भाई जमीर भाई अमोल आढागळे देवराज थोरात राधाकिसन शिंदे लखन लांडगे बाळू आव्हाड अनिल आव्हाड कारण सरवदे मिलिंद पाटोळे नाना पाटोळे अनिल कुचेकर सतीश हनवते किशोर मुजमुले संदीप वासलेकर अमोल मुजमुले सतीश हनवते कारण सर्व दे बालाजी इचके बाबू हातागळे अनिल आव्हाड अरुण आव्हाड उमेश आव्हाड राजाभाऊ हातागळे विलास कारके पिंटू आडागळे राम आडगळे वशिष्ठ आठवे काशिनाथ आडगळे संचार उमाप राजू नाडे शिवाजी आव्हाड बाबू आवड अजित गालफडे अभिषेक आडगळे बाबू मुजमुले भैया थोरात दादाराव गायकवाड राहुल वैरागे सुनील थोरात अजीम भाई लखन लांडगे सरपंच संतोष हातागळे कपिल जोगदंड आदींची उपस्थिती होती




# भारताच्या ऑपरेशन सिंदूरची दहशत, पाकिस्तानमधील जैश-ए-मोहम्मदचे मुख्यालय कायमसाठी बंद

भारताच्या ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानी राज्यकर्ते चांगलेच घाबरले आहे. शस्त्रसंधीची भीक मागणारा पाकिस्तानला पुन्हा भारताच्या कारवाईची भीती वाटत आहे. यामुळे पाकिस्तानने बहावलपूरमधील दहशतवादी समूहाचे मुख्यालय 'जामिया सुभान अल्लाह' बंद केले आहे. भारताने मे महिन्यात ऑपरेशन सिंदूर राबवले होते. या दरम्यान जैश-ए-मोहम्मदचे पंजाब प्रांतातील बहावलपूर येथील मुख्यालयावर हल्ला केला होता. त्यात हे मुख्यालय उद्धस्त झाले होते. भारताच्या हल्ल्यानंतर आता हे मुख्यालय बंद दिसत आहे. भारताने ऑपरेशन सिंदूर संपले नसल्याचे आधीच जाहीर केले आहे. त्यामुळे पाकिस्तानकडून त्याची धास्ती घेतली जात आहे. गूगल मॅपवर मुख्यालय बंदचा मेसेज जैश-ए-मोहम्मदचे असलेले हे मुख्यालय सार्वजनिकरित्या एक मशीद असल्याचे सांगितले जात होते. परंतु त्यात जैश-ए-मोहम्मदकडून दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिले जात होते. दहशतवाद्यांची भरती करुन त्यांना जिहादी बनवले जात होते.



जैश ए मोहम्मदच्या कारवाया याच ठिकाणांवरुन सुरु होत्या. आता गूगल मॅपवर हे मुख्यालय बंद दिसत आहे. तसा मेसेज दिसत आहे.

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्यात २६ पर्यटकांची हत्या दहशतवाद्यांनी केली होती. त्यानंतर ६ आणि ७ मे रोजी रात्री भारताने ऑपरेशन सिंदूर राबवले. त्यात पाकिस्तान व्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानमधील दहशतवाद्यांची ९ तळ उद्धस्त केली. त्यात बहावलपूर येथील जैश-ए-मोहम्मदचे मुख्यालय होते. भारताच्या सीमारेषेपासून शंभर किलोमीटर लांब असलेल्या या ठिकाणी जैशचे मुख्यालय पूर्ण नष्ट झालेले दिसत आहे. भारताच्या कारवाईत जैश-ए-मोहम्मदचा प्रमुख मसूद अजहर याच्या परिवारातील दहा जणांचा मृत्यू झाला होता. तसेच त्याच्या चार जवळच्या साथीदारांचाही मृत्यू झाला होता. भारताच्या हल्ल्यानंतर त्या ठिकाणाच्या प्रतिमा उपग्रहाकडून मिळालेल्या आहेत. त्यात हे मुख्यालय ढिगाऱ्यामध्ये बदललेले दिसत आहे. भारताच्या कारवाईनंतर पुन्हा या ठिकाणी मुख्यालय सुरु करण्याचा पाकिस्तानचा कोणताच प्रयत्न दिसत नाही.

# पाकिस्तानला जोरदार झटका, जागतिक व्यासपीठावर चीनसह, मुस्लीम राष्ट्रांनी दिली भारताची साथ


जगभरात पाकिस्तान दहशतवाद्यांना पाठिंबा देणारा देश म्हणून ओळखला जातो. त्यामुळे जागतिक व्यासपीठावर चीनलाही पाकिस्तानची साथ देता येत नाही. पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध ब्राझीलमध्ये आयोजित ब्रिक्स पार्लियामेंट्री फोरममध्ये करण्यात आला. तसेच दहशतवादाविरोधात संयुक्त पत्रक जारी करण्यात आले. या व्यासपीठावर भारताने पहलगाम दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरसंदर्भात माहिती दिली. ब्रिक्समध्ये चीन आणि मुस्लीम राष्ट्रांनी घेतलेल्या भूमिका भारताचा हा कुटनैतिक विजय समजला जात आहे. दहशतवादाविरोधात एकत्र लढण्याचा संकल्प ब्रिक्समध्ये भारत, ब्राझील, रशिया, चीन, दक्षिण अफ्रीकासोबत ईराण, संयुक्त अरब अमीरात, इजिप्त, इथियोपिया आणि इंडोनेशिया हे देश आहे. या देशांच्या संसदीय मंचाची बैठक बाझीलमध्ये शुक्रवारी झाली. भारताकडून लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला या बैठकीत गेले. त्यात ब्रिक्सच्या सदस्यांनी दहशतवादाविरोधात एकत्र येऊन कारवाई करण्याचा संकल्प



केला. त्याला चीन आणि मुस्लीम राष्ट्रांनी पाठिंबा दिला. त्यामुळे पाकिस्तानसाठी हा मोठा झटका आहे. भारताच्या या मुद्यांना पाठिंबा बैठकीत बोलताना लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले, दहशतवाद आज जागतिक संकट बनले आहे. त्याचा सामना आंतरराष्ट्रीय पातळीवर एकमेकांच्या मदतीनेच केला जाऊ शकतो. त्यासाठी दहशतवादी संघटनांची आर्थिक मदत बंद झाली पाहिजे, आंतरराष्ट्रीय पातळीवर गुप्त सूचनांची प्रक्रिया अधिक वेगाने झाली पाहिजे. तपास आणि न्यायालयीन प्रक्रियेत सहकार्य वाढले पाहिजे. ओम बिर्ला यांच्या या मुद्यांना सर्वच राष्ट्रांनी पाठिंबा दिला. त्यानंतर ब्रिक्सच्या अंतिम घोषणापत्रात दहशतवादाविरोधात लढा देण्याचा संकल्प करण्यात आला. भारताच्या धोरणाची आणि नेतृत्वाची प्रशंसा ब्रिक्समध्ये करण्यात आली. जागतिक शांतता आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी सर्व सदस्य देशांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे, यावर ब्रिक्स संसद सदस्यांनी भर दिला. ओम बिर्ला यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्पष्ट आणि ठाम धोरणाचा पुनरुच्चार करत दहशतवादाविरुद्धचे झिरो टॉलरेंस धोरणही सांगितले. ब्रिक्समध्ये विविध जागतिक मुद्यांवर चर्चा झाली.

# अंतराळातून येतंय संकट? NASA चा मोठा खुलासा!

अंतराळातून एक प्रचंड खगोलीय एस्टेरॉयड पृथ्वीकडे येत आहे! नाव आहे एस्टेरॉयड 2003 MH4. हा तब्बल 335 मीटर रुंदीचा दगड 14 किलोमीटर प्रति सेकंद या भयंकर वेगाने धा व तो य . NASA च्या मते, एस्टेरॉयड पृ थ्वी च्या



जवळून गेला आहे. टक्कर झाली नाही, पण त्याचा आकार आणि जवळीक वैज्ञानिकांना सतर्क करत आहे. हा अंतराळातील धोका आहे की फक्त एक नजरेत येणारा खेळ? चला, या राक्षसी एस्टेरॉयडची कहाणी आणि NASA च्या नजरेतून त्याचं रहस्य जाणून घेऊया!

24 मे 2025 रोजी पृथ्वीच्या जवळून एक प्रचंड एस्टेरॉयड गेला आहे. त्याचं नाव आहे 2003 MH4. हा एस्टेरॉयड सुमारे 335 मीटर रुंद आहे, म्हणजे ज व ळ पा स तीन फुटबॉल मैदानं इतका मोठा. NASA च्या जेट प्रो प ल्श न लॅ बो रे ट री (JPL) नुसार, हा एस्टेरॉयड 14 किलोमीटर प्रति सेकंद (सुमारे 50,400 किमी/तास) या वेगाने अंतराळात धावतोय. इतक्या वेगाने तो दिल्ली ते मुंबई अंतर एका मिनिटापेक्षा कमी वेळात पार करू शकतो! हा एस्टेरॉयड 'संभाव्य धोकादायक' (Potentially Hazardous Asteroid – PHA) गटात मोडतो, पण सध्या पृथ्वीला त्याचा धोका नाही.

# आम्हाला फसवलं, पाकिस्तानचा चीनवर मोठा



पाकिस्तान चीनच्या जाळ्यात फसला आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये ड्रॅगनची जादू फुस्स झाली. पाकिस्तानचा आता आपल्या मित्रावर विश्वास उरलेला नाही. पाकिस्तानमध्ये HQ-9B आणि HQ-16 या एअर डिफेन्स सिस्टिमवरुन मोठा असंतोष आहे, असा चीनच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरच्या रिपोर्टमध्ये दावा करण्यात आलाय. या एअर डिफेन्स सिस्टिमची डिझाइन भारताच्या ब्राह्मोस सारख्या मिसाइलला इंटरसेप्ट करण्यासाठी बनवण्यात आलेली नाही, हे चीनने कबूल केल्यानंतर पाकिस्तानची नाराजी अजून वाढली.ऑपरेशन सिंदूरमध्ये जोरदार प्रहार झाल्यानंतर हा वाद समोर आलाय. भारताने पहलगाम दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानचे दहशतवादी तळ आणि सैन्य ठिकाणांवर अचूक हल्ले केले. यात ब्रह्मोस सुपरसोनिक क्रूज मिसाइलचा वापर करण्यात आला

# भारताच्या आणखी एका बॉर्डरवर तणाव, रात्रीच्या अंधारात मोठी Action, ऑपरेशन दरम्यान गोळीबार

अलीकडेच भारत-पाकिस्तान सीमेवर मोठा तणाव निर्माण झाला होता. दोन्ही बाजुंनी हल्ले झाले. त्यानंतर आता भारताच्या आणखी एका सीमेवर तणावपूर्ण स्थिती निर्माण झाली आहे. अरुणाचल प्रदेशात भारत-म्यानमार सीमेवर तणावपूर्ण स्थिती निर्माण झालीय. भारताने प्रत्युत्तर देण्यासाठी ऑपरेशन सुरु केलं आहे. सुरक्षापथकांना अरुणाचल प्रदेशच्या लोंगडिंग जिल्ह्यात पोंगचौ सर्कलवर अज्ञात केडर्सच्या हालचालींबद्दल माहिती मिळाली. ही माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा पथकांनी गुरुवारी सीमावर्ती भागात गस्त सुरु केली. संरक्षण मंत्रालयानुसार, घनदाट



जंगलातून जाताना सुरक्षापथकांना अज्ञात लोकांच्या हालचाली दिसल्या. एरियामध्ये अज्ञात लोक ये-जा करताना दिसल्यानंतर सुरक्षापथकांनी त्यांना हटकलं. त्यानंतर सुरक्षापथकांनी केलेल्या गोळीबाराला या केडर्सनी सुद्धा गोळीबाराने उत्तर दिलं. या गोळीबाराला सुरक्षापथकांनी चोख प्रत्युत्तर दिलं. भीषण गोळीबार सुरु असताना अज्ञात केडर आंतरराष्ट्रीय बॉर्डर पार करुन म्यांमारला निघून गेले. सुरक्षापथकांनी त्या भागाची तपासणी केली. केडर आसपासच्या घनदाट जंगलाचा फायदा घेऊन सीमापार करण्यात यशस्वी ठरले.

10 दहशतवाद्यांचा खात्मा याआधी 14 मे रोजी दक्षिण मणिपूरच्या चंदेल जिल्ह्यात असम रायफल्ससोबत झालेल्या चकमकीत 10 दहशतवादी मारले गेले. चंदेल जिल्ह्याची सीमा म्यांमारला लागून आहे. भारत-म्यांमार बॉर्डरवर सुरक्षापथकं अलर्ट झाली आहेत. प्रत्येक हालचालींवर बारीक लक्ष ठेवलं जात आहे. संरक्षण प्रवक्त्याने सांगितलं की, 14 मे च्या चकमकीवेळी चंदेल जिल्ह्यात म्यांमार सीमेजवळ न्यू समताल गावाजवळ संशयित कॅडर्सनी असम रायफल्सच्या गस्ती पथकावर मोठ्या प्रमाणात गोळीबार केला होता. त्यानंतर सैनिकांनी अचूक आणि कॅलिब्रेटेड उत्तर दिलं. यात 10 दहशतवादी मारले गेले.

चार राज्यांची सीमा म्यानमारला लागून

भारत-म्यांमार सीमेवर बारीक लक्ष ठेवलं जात आहे. प्रत्येक हालचालींवर सुरक्षा पथकांची नजर आहे. शांतता आणि स्थिरतेसाठी नागरिक प्रशासन आणि गोपनीय संस्थांमध्ये चर्चा सुरु आहेत. अरुणाचल प्रदेश, मणिपूर, नागालँड आणि मिजोराम या चार राज्यांची सीमा म्यानमारला लागून आहे.

# रशियाचा युक्रेनवर पुन्हा तुफान हल्ला, ड्रोन अनब क्षेपणास्त्रांचा पाऊस पाडताच झेलेन्स्कीकडून शांततेसाठी साकडे?

रशिया आणि युक्रेन दरम्यान सुरु असलेले युद्ध तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर पोहचण्याची शक्यता आहे. युक्रेनने रशियावर केलेल्या हल्ल्याचा बदला व्लादीमीर पुतिन यांनी शुक्रवारी घेतला. त्यानंतर शनिवारीसुद्धा युक्रेनवर तुफान हल्ले रशियाने केले. यामध्ये ४०० पेक्षा जास्त ड्रोनने हल्ले करण्यात आले. त्यामुळे युक्रेनच्या अवकाशात अनेक स्फोट होताना दिसत होते. तसेच क्षेपणास्त्रानेसुद्धा हल्ले करण्यात आले. या हल्ल्यात सहा जणांचा



मृत्यू झाला असून ८० पेक्षा जास्त जण जखमी झाले आहे.

यामुळे केले हल्ले रशियाच्या चार एअरबेसवर

युक्रेनने हल्ला करत ४१ लढाऊ विमाने नष्ट केली होती. त्याचवेळी पुतिन यांनी युक्रेनवर जोरदार हल्ल्याचा निर्णय घेतला होता. युक्रेनच्या या हल्ल्यात युरोपचा सहभाग असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे रशिया आणि युक्रेन युद्ध तिसऱ्या महायुद्धाच्या दिशेने वाटचाल करण्याची भीती व्यक्त केली जात आहे. शांतता आणि सुरक्षेची गरज

युक्रेनची राजधानी क्यीववर रशियाने शनिवारी जोरदार हल्ले केले. त्याबाबर युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदीमिर झेलेंस्की यांनी म्हटले की, युक्रेनवर ४०० पेक्षा जास्त ड्रोन हल्ले झाले. शहरात सातत्याने सायरन वाजत आहे. यामध्ये ८० पेक्षा जास्त जण जखमी झाले आहे. कोणीही या हल्ल्याचा निषेध केला नाही, हे दुर्भाग्यपूर्ण आहे. त्याचा फायदा पुतिन घेत असल्याचे झेलेंस्की यांनी म्हटले.

झेलेंस्की यांनी पुढे म्हटले की, जगभरात एकता नाही. त्याचा फायदा पुतिन घेत आहे. त्यांच्यावर दबाव टाकण्याची गरज आहे. सुरक्षा आणि शांतता गरजेची आहे. शस्त्रसंधीची खूप गरज आहे. रशियाने हल्ले थांबवण्यासाठी त्यांच्यावर दबाव टाकला गेला पाहिजे.

युक्रेनमधील अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, क्वीवसह चेरनिहीव, लुट्स्क आणि टेर्नोपिल शहरावर क्रूज क्षेपणास्त्र आणि ड्रोनने हल्ले झाले. रशियाने म्हटले की, युक्रेनच्या दहशतवादी कृत्याला उत्तर म्हणून हे हल्ले करण्यात आले. आमच्या लष्कराने जमीन, पाणी आणि हवेवरुन मार्मिक हल्ले केले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com